देशोन्नती

# पाळधी येथे सायबर सुरक्षेवर जनजागृती

देशोन्नती वृत्तसंकलन

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाळधी येथे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

पाळधी येथील सिध्दा विनायक गणपती मंदिरात क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी सायबर सुरक्षेतेबाबत जनजागृती केली. त्यात ओटीपी फ्रॉड, बँक फ्रॉड, फिशींग, सायबर बुलिंग, फेक कॉल्स इ. गुन्ह्यांबद्दल नाट्य स्वरुपात सायबर सुरक्षेतेबाबत जनजागृती केली. यावेळी उपस्थित असलेल्या ४०० भावीक भक्तांनी या सायबर सुरक्षीततेबाबत माहिती घेतली. यावेळी क्विक हिल सायबर वारिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे अध्यक्ष पायस सावळे, सेक्रेटरी मयुर बाडे, ॲक्टिव्हीटी डायरेक्टर श्वेता फिरके, पीआर मिडीया डायरेक्टर प्रगती कोल्हे व शिक्षक समन्वयक प्रा. राजु आमले आणि ३६ स्वयंसेवकांनी नाट्य स्वरुपात सायबर सुरक्षितता या विषयावर जनजागृतीबाबत मार्गदर्शन केले.